महाराष्ट्र शासन
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,
शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, जी.एस. ग्राउंड जवळ, जळगाव
दूरध्वनी क्र.:- ०२५७-२९५९७९०
Email: jalgaonrojgar@gmail.comWebsite: www.mahaswayam.gov.in

जा.क्र.२६/जिकौविरोवउमाकेंज/रो.मे./173 /२०२६

दिनांक २१ सप्टेंबर, २०२६

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व आर्टस, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालये,
जिल्हा जळगाव.

**विषय:-** दिनांक २९/०९/२०२६ रोजी जळगाव जिल्ह्यात आयोजित "रोजगार महाकुंभ" रोजगार मेळाव्याबाबत आणि अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची नोंदणी करून घेण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने **मा.ना.श्री मंगल प्रभात लोढा मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन** यांच्या संकल्पनेतुन जळगाव जिल्ह्यात मंगळवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजी भव्य **"रोजगार महाकुंभ"** चे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तसेच तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या तरुणांना स्थानिक व नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी एकाच दिवशी संपूर्ण जळगाव जिल्ह्यात **एकूण २३ विविध ठिकाणी** हा रोजगार मेळावा आयोजित केला जात आहे. या रोजगार महाकुंभामध्ये विविध नामांकित मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल, आयटी, हॉस्पिटल्स, फार्मास्युटिकल व सर्व्हिस क्षेत्रातील उद्योगांकडून मोठ्या प्रमाणावर रिक्त पदांसाठी थेट भरती होणार आहे.

या अनुषंगाने आपणास नम्र विनंती करण्यात येते की आपल्या महाविद्यालयातील / शैक्षणिक संस्थेतील **अंतिम वर्षात शिकत असलेल्या (Final Year) सर्व विद्यार्थ्यांना** तसेच नुकतेच उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना या रोजगार महाकुंभाबाबत अवगत करावे. सर्व पात्र विद्यार्थ्यांनी खालील गुगल फॉर्म लिंक **https://forms.gle/vBTzRQKYBBuBT4em7** किंवा सोबत जोडलेल्या पत्रकातील QR कोड स्कॅन करून आपली ऑनलाइन पूर्वनोंदणी त्वरित पूर्ण करावी. विद्यार्थ्यांना मुलाखतीस जाताना आवश्यक त्या शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती, पासपोर्ट फोटो, आधार कार्ड आणि बायोडाटा (Resume) च्या किमान ४ ते ५ प्रती सोबत बाळगण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

आपल्या महाविद्यालयाच्या अधिकृत सूचना फलकावर (Notice Board) तसेच विद्यार्थ्यांच्या व्हॉट्सॲप / टेलिग्राम ग्रुप्सवर सोबत जोडलेली २३ मेळावा ठिकाणांची यादी, पदांची माहिती (Vacancy List) आणि QR कोडचे पत्रक प्रसिद्ध करावे, जेणेकरून आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना रोजगाराचा लाभ घेता येईल.

कृ.मा.प





महाराष्ट्र शासन

कौशल्यम् बलम्

## मा.ना.श्री.मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतुन



# रोजगार महाकुंभ

**मंगळवार दि.२९ सप्टेंबर २०२६**

**मा.ना.श्री.मंगल प्रभात लोढा**
मंत्री कौशल्य,रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग

| अ.क्र. | तालुका | स्थळ (औद्योगिक संघटना/विद्यापीठ/कॉलेज इ.नाव | अ.क्र. | तालुका | स्थळ (औद्योगिक संघटना/विद्यापीठ/कॉलेज इ.नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | जळगांव | गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय, पी ५१. एम सेक्टर अतिरिक्त एम.आय.डी.सी भुसावळ रोड, जळगाव | १३ | भुसावळ | राही फॉऊडेशन, नहाटा महाविद्यालय परिसर, जामनेर चौफुली, भुसावळ ता. भुसावळ |
| २ | जळगांव | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव | १४ | बोदवड | श्री.ओमकारलालजी रामकुंवरजी अग्रवाल सभागृह (अग्रसेन भवन), बोदवड |
| ३ | जळगांव | लिग्रॅड इंडिया प्रा.लि. प्लॉट न.डी.४ एम.आय.डी सी, अंजिठा रोड, जळगाव | १५ | चाळीसगांव | शिवनेरी फॉऊडेशन, चाळीसगाव |
| ४ | जळगांव | सुप्रिम इंडस्ट्रिज, डी-१०१-१०२, एम. आय.डी.सी, जळगाव | १६ | चोपडा | तहसील कार्यालय सभागृह, चोपडा |
| ५ | जळगांव | निमजाई फॉऊडेशन स्किल सेंटर, जुना नशिराबाद रोड, जळगाव | १७ | एरंडोल | दादासाहेब डिंगबर शंकर पाटील आर्टस, कॉमर्स अण्ड सायन्स महाविद्यालय, एरडोल |
| ६ | जळगांव | केमीस्ट भवन, २ एच २८+ ४५३, गणेश नगर, नवीन जोशी कॉलनी, जळगाव | १८ | मुक्ताईनगर | कृषी महाविद्यालय, मुक्ताईनगर |
| ७ | जळगांव | खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी (KCE) महाविद्यालय, जळगाव | १९ | पाचोरा | एस.एस.एम.एम.महाविद्यालय, भडगाव रोड, पाचोरा |
| ८ | धरणगांव | एस.एस.बी.टी महाविद्यालय, बांभोरी,धरणगांव (जळगांव) | २० | पारोळा | राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा |
| ९ | सावदा | नगर परिषद हॉल, सावदा | २१ | रावेर | श्री. विठ्ठलराव शंकरराव नाईक आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, ब-हाणपुर रोड, रावेर ता. रावेर |
| १० | जळगांव | कवयित्री बहिणाबाई चौधरी,उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ, जळगाव | २२ | यावल | जेडीएमविपी आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, फैजपुर रोड, यावल |
| ११ | अमळनेर | प्रताप महाविद्यालय, रेल्वे स्टेशन जवळ, अमळनेर | २३ | जामनेर | जामनरे रेवा गुजर मंडळ, जामनेर संचालित श्रीमंत बाबाजी राघो पाटील मंगल कार्यालय,जामनरे |
| १२ | भडगांव | सौ. रजनीताई नानासाहेब देशमूख आर्टस,कॉमर्स अण्ड सायन्स महाविद्यालय, भडगाव | | | |

## जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,जळगाव

शासकीय तांत्रिक विद्यालय आवार,जी.एस.ग्राऊंड जवळ,जळगाव -४२५००१

दूरध्वनी क्र.०२५७-२९५९७९० वेबसाईट : www.mahaswayam.gov.in (0257)-2959790

https://forms.gle/vBTzRQKYBBuBT4em7

नोंदणीसाठी क्यु.आर कोड स्क्रेन करा